# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

## ।। प्र क ट न ।।

**विषय:** मंडळामार्फत मार्च–एप्रिल २०२२ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी ) परीक्षेचे आवेदनपत्र ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या कालावधीबाबत

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत मार्च–एप्रिल २०२२ मध्ये उच्च माध्यमिक प्रमाणपत्र ( इ.१२वी )परीक्षा दि.०४/०३/२०२२ ते दि.०७/०४/२०२२ पर्यंत या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

मार्च–एप्रिल २०२२ इ.१०वी व इ.१२वी च्या परीक्षेसाठी आवेदनपत्र भरणाऱ्या विद्यार्थ्यांना विलंब शुल्क आकारण्यात येऊ नये/विलंब शुल्क माफ करण्यात यावे. तसेच विद्यार्थ्यांना परीक्षेच्या आदल्या दिवशीपर्यंत ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी असे शासनाने पत्र क्र.लवेसू–२०२१/प्र.क्र.९७/एसडी–२ दि. २८/१२/२०२१ च्या पत्रान्वये कळविलेले आहे. त्यानुसार सदर बाब सर्व संबंधित घटकांना कळविण्यात आलेली आहे.

तथापि उच्च माध्यमिक प्रमाणपत्र ( इ.१२वी ) परीक्षा माहे दि.०४/०३/२०२२ पासून सुरु होत असल्याने, सदर परीक्षेचे आवेदनपत्र नियमित शुल्कासह ऑनलाईन पध्दतीने दि.०३/०३/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंतच भरण्याची सुविधा उपलब्ध राहील, तदनंतर आवेदनपत्र भरणेसाठी संकेतस्थळ बंद करण्यात येणार आहे.

तरी याबाबतची सर्व मुख्याध्यापक/प्राचार्य, सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये, शिक्षक , विद्यार्थी, पालक व इतर संबंधित घटकांनी नोंद घ्यावी.

(डॉ.अशोक भोसले)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे–०४

दि. २८/०२/२०२२